# मुंबई विद्यापीठ

**No. Aff./ICC/ (2019-20)/04/ of 2019**

परिपत्रक:

विषय:— मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालये/परिसंस्था व त्यांचे अभ्यासक्रम, विषय, विद्याशाखा, तुकडया इत्यादींचे तपासणी करण्याबाबत.

संदर्भ:— प्रशासन अधिकारी, शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) यांचे क्र. युएनआय/(८२/१८)अधि.३/विशी—१/८६०२ दिनांक १४ मार्च, २०१९ रोजीचे पत्र.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संचालक यांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालये/ परिसंस्था व त्यांचे अभ्यासक्रम, विद्याशाखा, अभ्यासक्रम, विषय, तुकडया इत्यादींचे शैक्षणिक ऑडिट करणे आवश्यक असल्यामुळे खालील दिलेल्या तक्त्यामध्ये माहिती सहाय्यक कुलसचिव, रूम क्र. २०७, संलग्नता विभाग, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई— ४०० ०३२ येथे आठ दिवसाच्या आत त्वरीत हस्तेबटवडा जमा करण्यात यावीत.

| अ. क्र. | संस्थेचे नाव व पत्ता | महाविद्यालयाचे नाव व पत्ता, स्थापन वर्ष | अभ्यासक्रमाचे नाव व प्रवेश क्षमता | अतिरिक्त तुकडी | नविन विषय | नविन विद्याशाखा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

(डॉ अजय देशमुख)
कुलसचिव

मुंबई—४०० ०३२
23 मे, २०१९

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संचालक.

महाराष्ट्र शासन

शिक्षण संचालनालय(उच्च शिक्षण)

महाराष्ट्र राज्य, पुणे- ४११ ००१.

www.dhepune.gov.in Email- vishi.dhepune@nic.in

फोन नं.०२०/२६१२२११९,२६०५१५१२,२६१२४६३९ फॅक्स ०२०/२६१११११५३


क्रमांक- युएनआय/(८२/१८)/अधी.३/विशि-१ /8602 दिनांक- 04 MAR 2019

प्रति,

कुलसचिव,
मुंबई विद्यापीठ,
मुंबई.

**विषय- मुंबई विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये/परिसंस्था व त्यांचे अभ्यासक्रम, विषय, विद्याशाखा, तुकडया इत्यादींचे तपासणी करण्याबाबत.**

संदर्भ- १.शासन शुध्दीपत्रक उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण२०१८/प्र.क्र.७१/विशि-३ दिनांक १२ ऑक्टोबर, २०१८
२. शासनपत्र क्रमांक संकीर्ण२०१८/प्र.क्र.७१/विशि-३ दिनां ०१.११.२०१८

उपरोक्त विषयाबाबत संदर्भिय पत्रानुसार कळविण्यात येते की, मुंबई विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये/परिसंस्था व त्यांचे अभ्यासक्रम, विद्याशाखा, अभ्यासक्रम, विषय,तुकडया इत्यांदीचे शैक्षणिक ऑडिट करणे आवश्यक असल्यामुळे शासनाने राज्य स्तरावर मा.अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केलेली आहे.

तसेच या शासन निर्णयामध्ये कार्यबल गट स्थापन केलेला असून या कार्यबल गटाची बैठक दिनांक १८ जानेवारी, २०१९ रोजी दुपारी ३.०० वाजता माहिती तंत्रज्ञान विभाग, आयडीओएल बिल्डिंग, कलिना कॅम्पस, सांताक्रुझ(पुर्व)मुंबई विद्यापीठ, मुंबई येथे आयोजित करण्यात आलेली होती. या बैठकीचे इतिवृत्त आपणास संचालनालयाच्या समक्रमांक दिनांक २३ जानेवारी, २०१९ रोजीच्या पत्रान्वये पाठविण्यात आलेले आहे.

या इतिवृत्तात नमूद केले आहे की, समितीने जो Draft तयार केलेला आहे तो सर्व महाविद्यालयांना पाठविण्यापुर्वी काही निवडक महाविद्यालयांना भरण्यास द्यावा व त्यात काही त्रुटी/सूचना असतील तर त्याचा विचार करुन हा Draft पुर्ण करावा व विद्यापीठांच्या कुलगुरुंशी चर्चा करुन पुढील कार्यवाही करावी असे ठरले.

22 May

For n.a Urgent
15/5/19
D.R. Affiliation

हा Draft हा मुंबई विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या खालील महाविद्यालयांना पाठविण्यात यावा.

१. आर.बी.गोगटे-जोगळेकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, रत्नागिरी
२. सी.डी देशमुख, कॉमर्स व के.जी. ताम्हाणे आर्टस कॉलेज,रोहा जि.रायगड
३. नागिनदास खांडवाला महाविद्यालय, मालाड, मुंबई.
४. रुईया महाविद्यालय, दादर,मुंबई.
५. सरदार पटेल इंजिनिअरींग महाविद्यालय, अंधेरी, मुंबई.
६. सोमय्या इन्स्टिटयुट मॅनेजमेंट स्टडीज विद्याविहार, मुंबई.
७. बा.ना.बांदोडकर विज्ञान महाविद्यालय, ठाणे.
८. साठे महाविद्यालय, विलेपार्ले,मुंबई.
९. पोद्दार कॉलेज, दादर,मुंबई.
१०. रिझवी बीएड महाविद्यालय, बांद्रा, मुंबई.
११. शारिरीक शिक्षण महाविद्यालय,वडाळा,मुंबई
१२. के.सी लॉ कॉलेज, चर्चगेट, मुंबई

या संदर्भात आपणाकडून सदरचा Draft पाठविण्यात आलेला आहे किंवा कसे, याबाबत या संचालनालयास कळविण्यात यावे. तसेच या इतिवृत्तात नमूद केल्याप्रमाणे आपल्या विद्यापीठाने विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या महाविद्यालयासंदर्भात खालील माहिती ही विद्यापीठातील आयटी विभागास देण्यात यावी असे कळविलेले होते.

Issue Circular to all affiliated colleges
JR
Bl.

| अ.क्र. | संस्थेचे नांव | महाविद्यालयाचे नांव | अभ्यासक्रमाचे नांव |
|---|---|---|---|
| | | | |

सदरची माहिती ही आयटी विभागास देण्यात आलेली आहे अथवा कसे या बाबत संचालनालयास कृपया अवगत करावे.

(सुयश दुसाने)
प्रशासन अधिकारी
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.